

त्रिमूर्ती शिक्षण संस्थेचे

# श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै.डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालय, साक्री ता.साक्री जि.धुळे

नॅक प्रमाणित

## स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव



# माहिती पुस्तीका

सन २०२२-२०२३

## महाविद्यालयाची यशोगाथा / वाटचाल

| | | |
|---|---|---|
| महाविद्यालय स्थापना | : | १९ ऑगस्ट १९९८ |
| महाविद्यालय मान्यता | : | महाराष्ट्र शासन जा.क्र.एनजीसी–२५९८/नमवि/(०१/९८) मशि–३ उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मंबई – ३२ दि.१९ ऑगस्ट १९९८ |
| कॉलेज कोड नं. | : | २१००७६ |
| कॉलेज सेंटर कोड नं. | : | २१०५ |
| युजीसी | : | २ (एफ) दि.२ सप्टेंबर २००९, १२ (बी) दि.१२ जानेवारी २०११. |
| विद्याशाखा | : | कला व विज्ञान, एम.ए.इतिहास. विद्यापीठ १८१ अंतर्गत परिवहन व पर्यटन व्यवस्थापन प्रमाणपत्र व पदविका अभ्यासक्रम |
| य.च.म.मु.वि.नाशिक | : | बी.ए. व एम.ए. एम.बी.ए.(मराठी, हिंदी) प्रवेश मिळेल. |
| एकूण विभाग | : | २१ |
| उच्च विद्याविभुषित शिक्षक | : | शिक्षक–३१, पीएच.डी.१५, एम.फिल –१६, सेट–नेट –०४ |
| शिक्षकेतर कर्मचारी | : | ०९ |
| जिमखाना विभाग | : | राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळांची सुविधा |
| ग्रंथालय | : | ग्रंथसंख्या–७४८५, मुल्य–१०,२०,८६९ रूपये. |
| राष्ट्रीय सेवा योजना | : | नियमित कार्यक्रम–१५० विद्यार्थी, विशेष श्रमसंस्कार शिबीर–७५ विद्यार्थी |
| आदिवासी विद्यार्थ्यांसाठीः | | एकलव्य प्रशिक्षण केंद्र |
| चाणक्य स्पर्धा परिक्षा केंद्रः | | स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र |
| आजीवन शिक्षण केंद्र | : | युवती सभा |
| अंतर्गत दर्जा सुधार कक्षः | | (Internal Quality Assurance Cell) |

विद्यार्थी समुह विमा योजना व कर्म. भाऊराव पाटील कमवा व शिका योजना.
विद्यार्थी व्यक्तीमत्वासाठी विविध मंडळाद्वारे कार्यक्रमांचे आयोजन.

22-23

**श्रीमती वि.उ.पाटील-कला व कै.डॉ.भा.स.देसले विज्ञान महाविद्यालय, साक्री**

## सुस्वागतम्....


महाविद्यालयातील प्रवेश घेणाऱ्या सर्व विद्यार्थी–विद्यार्थीनींचे हार्दिक स्वागत !

दुरीतांचे तिमीर जावो । विश्व स्वधर्म सूर्य पाहो । हे ब्रिद वाक्य सत्यात आणणाऱ्या कै.डॉ. बाबासाहेब भास्कर सदाशिव देसले यांनी स्थापन केलेल्या त्रिमुर्ती शिक्षण संस्थेच्या विद्यमान अध्यक्ष मा.श्रीमती मृणाल भास्कर देसले व सचिव श्रीमती डॉ.मंगलाताई भास्कर देसले व उपाध्यक्ष,श्री.दादासो.डॉ.अजिंक्य भास्कर देसले यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाची यशस्वी वाटचाल सुरू आहे.

कला शाखेत पदवी व पदव्युत्तर आणि विज्ञान शाखेत पदवीपर्यंत शिक्षणाची महाविद्यालयात सोय आहे. या वर्गांची प्रवेशप्रक्रीया सुरू आहे. महाविद्यालयात प्रवेश घेण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचे माहितीपत्रक पुर्णपणे वाचावे व प्रवेश अर्ज करावा. प्रवेश आरक्षण व पात्रता परीक्षा याबाबत क.ब.चौ.उ.म.वि. जळगाव व महाराष्ट्र शासनचे नियम पाळले जातात. महाविद्यालयात शिकविल्या जाणाऱ्या विषयांची वर्षनिहाय सूची व गट तसेच फी संबंधीचा तक्ता पुढे दिलेला आहे. फी संदर्भात महाराष्ट्र शासन व कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव वेळोवेळी जे बदल करतील ते विद्यार्थ्यांस बंधनकारक राहतील.

शैक्षणिक वर्ष २०१८–१९ पासून य.च.म.मु.वि.नाशिक यांनी बी.ए.,बी.कॉम व एम.ए.(मराठी, हिंदी व इंग्रजी) विषयांसाठी नविन अभ्यासक्रम केंद्रास मान्यता दिली आहे. व शैक्षणिक वर्ष २०२१–२२ पासून एम.बी.ए. साठी मान्यता मिळाली आहे. वर्षभर नियमित अभ्यास व अभ्यासेत्तर कार्यक्रम आयोजित करून विद्यार्थ्यांना सर्वांगिन विकास होण्याच्या दृष्टीने महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी प्रयत्नशिल असतात. त्यात विद्यार्थ्यांनी सक्रीय सहभाग द्यावा तसेच महाविद्यालयाच्या नियमांचे व शिस्तीचे पालन करून यशस्वी व सुजाण नागरीक घडावा ही हार्दिक शुभेच्छा !

साक्री (धुळे)



प्राचार्य डॉ.पी.एस.सोनवणे

प्राचार्य
त्रि.शि.स.चे श्रीमती वि.उ.पाटील कला व
कै.डॉ.भा.स.देसले विज्ञान महाविद्यालय
साक्री, ता साक्री. जि.धुळे

२१ व्या शतकाला सामोरे जाण्यासाठी व आपली शैक्षणिक वैचारिक आर्थिक प्रगती साधण्यासाठी कै.डॉ.बाबासाहेब भास्कर सदाशिव देसले यांनी दुरदृष्टी ठेवून त्रिमुर्ती शिक्षण संस्थेची मुहूर्तमेढ रोवली आज आमच्या महाविद्यालयाचे विद्यार्थी पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेऊन विविध क्षेत्रात आपले कार्य कर्तृत्व सिध्द करित आहेत.

आमचे महाविद्यालय क.ब.चौ. पदविधर उ.म.विद्यापीठ जळगांवशी संलग्न असून आमच्या महाविद्यालयात कला शाखेत पदवीपर्यंत तर विज्ञान शाखेत संगणक,माहिती तंत्रज्ञान,रसायनशास्त्र सुक्ष्मजीवशास्त्र,जैविक रसायनशास्त्र हे रोजगाराभिमुख अभ्यासक्रम शिकविला जातो. तसेच प्रवेशपात्रता अभ्यासक्रम,परीक्षा,शुल्क इ. बाबतीत क.ब.चौ.उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगांवच्या व महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार कार्यवाही करण्यात येते.

विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढी बरोबर विविध उपक्रम व कार्यक्रमांद्वारे त्यांच्या व्यक्तिमत्वाचे सर्वांगीण जडन-घडवून सर्व सक्षम आदर्श नागरीक घडवून लोकशाही जीवनमुल्ये विद्यार्थ्यांत रूजविण्याचा प्रयत्न व त्यास विज्ञाननिष्ठ करून २१ व्या शतकाला सामोरे जाण्यासाठी सुशिक्षित,आदर्शमुल्ये जपणारा एक सुजाव युवक घडविणे हेच महाविद्यालयाचे ध्येय आहे.

**संस्थेची वैशिष्टये :-** महाविद्यालयाच्या स्थापनेनंतर संस्थेने स्वतःची भव्य वास्तू प्रशस्त जागेत सुरत नागपूर महामार्गालगत,निसर्गरम्य अशा वातावरणात उभी केली आहे. या वास्तूत प्रशासन विभाग, प्राचार्य दालन, प्राध्यापक दालन,महिला दालन तसेच संगणक,माहिती व तंत्रज्ञान,रसायनशास्त्र,सुक्ष्मजीवशास्त्र,जैविक रसायनशात्र, इलेक्ट्रानिक, भूगोल, भौतिकशास्त्र यांच्या स्वतंत्र्य प्रयोगशाळा, ग्रंथालय, वाचनकक्ष, उपहारगृह व लॅग्वेज लॅब इ. सोयींनी परिपूर्ण आहे.

**ग्रंथालय :-** विद्यार्थ्यांची बौध्दीक वैचारिक,सांस्कृतिक पातळी उंचावण्याच्या दृष्टीकोनातून आमच्या ग्रंथालयात क्रमीक पुस्तके, संदर्भग्रंथ, मासिके, नियतकालिके, मराठी, हिंदी, इंग्रजी या विविध भाषेत उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत.

**१) पुस्तक देव-घेव योजना :-** महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांस ग्रंथालय कार्ड दिले जाते. या कार्डावर घरी अभ्यासणासाठी पुस्तके दिली जातात. ती आठवडयातून दोन वेळ बदलून दिली जातात. त्याचप्रमाणे ओळखपत्रावर देखील ग्रंथालयात वाचन कक्षात पुस्तके दिली जातात.

**२) अभ्यासिका :-** महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी ग्रंथालयात स्वतंत्र्य अभ्यासिका दालन



आहे. अभ्यासिकेची वेळ सकाळी ८.३० ते ४.३० वाजेपर्यंत आहे. तसेच रात्री वसतीगृहासाठी विद्यार्थ्यांसाठी वाचनाची सोय आहे.

**३) संगणक :-** ग्रंथालयात स्वतंत्र्य संगणक असून तेथे इंटरनेटची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

**४) अभ्यासक्रम आणि प्रश्नसंच :-** क.ब.चौ.उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे सर्व वर्गांचे अभ्यासक्रम ग्रंथालयात प्राध्यापक व विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी उपलब्ध करून दिली जातात. विद्यापीठामार्फत घेतल्या गेलेल्या मागील वर्षांचे प्रश्न संच सर्वांना उपलब्ध करून दिली जातात.

**विविध मंडळे :-** विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्व विकास साधण्यासाठी विविध मंडळमार्फत कार्यक्रम योजिले जातात. नाटय, निबंधलेखन, काव्यलेखन व अन्य माहितीवर लिखाण करता यावे व त्याच्या वक्तृत्व कलेला उजाळा मिळावा म्हणून विविध मंडळा मार्फत विविध कार्यक्रम आयोजित केले जातात.

**जीमखाना :-** जीमखाना विभागातर्फे राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय खेळ खेळले जातात व शिकविले जातात. तसेच विभागीय व विद्यापीठ स्तरीय खेळांमध्ये विद्यार्थ्यांना संधी दिली जाते.

**राष्ट्रीय सेवा योजना :-** विद्यापीठ अंतर्गत महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेचे एकक कार्यरत आहे. विद्यार्थ्यांच्या मानसिक, बौध्दीक,शारिरीक विकासाबरोबर श्रमप्रतिष्ठा, सेवाभाव, सहजीवन इ. गुण विकसित व्हावे म्हणून राष्ट्रीय सेवा योजने मार्फत विविध कार्यक्रम राबविले जातात. विद्यापीठामार्फत श्रमसंकस्कार शिबिर,व विविध राष्ट्रीय,सामाजिक कार्यक्रम आयोजन केले जातात.

**करियर कट्टा :-** शै.वर्ष २०२१-२२ पासून महाराष्ट्र शासन व विद्यापीठाच्या आदेशानुसार महाविद्यालयास करियर कट्टा स्थापन करण्यात आला आहे. आय.पी.एस.अधिकारी आपाचा दारी व अध्योगत मान्यता प्रवेश देण्यात येईल.

**चाणक्य स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र :-** २१ वे शतक हे स्पर्धेचे युग मानले जाते. पदवी घेतल्यानंतर विद्यार्थ्यास प्रशासकीय सेवेचा लाभ व्हावा यासाठी विविध स्पर्धा परीक्षा आयोजित केल्या जातात. या स्पर्धा परीक्षांना सामेरे जाण्यासाठी ग्रामीण भागातील विद्यार्थी समर्थपणे उज्वल भविष्याकडे वाटचाल करण्यासाठी सक्षम व्हावा म्हणून क.ब.चौ.उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने चाणक्य स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन सुरू केले २०१०-२०११ पासुन आमच्या महाविद्यालयात हे केंद्र सुरू केले आहे. विद्यार्थ्यांना तज्ञ अनुभवी प्राध्यापक मार्गदर्शन करतात. केंद्रासाठी ग्रंथालयात व्यवस्था करण्यात आलेली आहे.

**महाविद्यालय प्रवेश नियमावली :-**

१) प्रथम वर्ष कला व विज्ञान अभ्यासक्रमाचे प्रवेश विद्यापीठाच्या नियमानुसार व वेळेत पुर्ण माहिती भरून व ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया पुर्ण करावी.

२) एकदा पात्रता झाल्यानंतर विद्यार्थ्यांना विषय बदलता येणार नाही.

महाविद्यायातील सर्व विद्या अभ्यासक्रमांसाठी पदवी तसेच पदव्युत्तर (एम.ए.इतिहास) प्रवेश प्रक्रिया मा. न्यायालय, महाराष्ट्र शासन व विद्यापीठ यांनी ठरविलेल्या नियमानुसार राहिल. महाविद्यालयात प्रवेश घेण्यापूर्वी प्रत्येक विद्यार्थ्यांने महाविद्यालयाचे माहिती पत्रक घेऊन प्रवेश अर्ज करावा. प्रवेश घेतल्यानंतर विद्यापीठ नियमानुसार प्रत्येक विषयाची प्रत्येक सत्रात चाचणी परीक्षा घेतली जाईल. प्रवेश आरक्षणाबाबत महाराष्ट्रशासन व विद्यापीठाचे नियम पाळले जातील.

**प्रवेश घेतांना जोडावयाची कागदपत्रे :-**

१) प्रवेश अर्ज

२) १० वी १२ वी गुणपत्रक व त्यांच्या प्रत्येकी दोन छायांकीत (झेरॉक्स) प्रती

३) शाळा सोडल्याचा मुळ दाखला (LC/TC) व दोन छायांकीत (झेरॉक्स) प्रती

४) २ पासपोर्ट साईज फोटो

५) गॅप असल्यास गॅप सर्टीफिकेट

६) आधार कार्ड

७) मागासवर्गीय इतर मागासवर्गीय प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्र व उत्पन्नाचा दाखला.

८) स्थलांतर प्रमाणपत्र (मायग्रेशन सर्टिफिकेट) (१२ वी परिक्षा महाराष्ट्र बाहेरील बोर्डातून उत्तीर्ण केले असल्यास अथवा उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ व्यतिरिक्त इतर कुठल्याही विद्यापीठाच्या अथवा बोर्डाच्या कुठल्याही अभ्यासक्रमास प्रवेशित असल्यास)

टिप : डुप्लीकेट एल.सी./टी.सी. वर प्रवेश मिळणार नाही.

**विद्यार्थ्यांनी वर्षनिहाय अभ्यासावयाचे विषय :**

**प्रथम वर्ष कला :-** SEM - I & II विद्यापीठाच्या CBCS Pattern नुसार प्रथम वर्ष कला वर्गासाठी खालील गट ठरवून दिलेले आहेत. विद्यार्थ्यांने त्यांपैकी एकूण सहा विषयांची निवड करावयाची आहे.



| | | |
|---|---|---|
| **Group A :** | **(Compulsory Group)** | |
| | Compulory English | |
| **Group B :** | **(Compulsory Group)** (खालीप पैकी कोणताही एक विषय निवडता येईल.) | |
| | Marathi | मराठी |
| | Hindi | हिंदी |
| | Optional English | वैकल्पिक इंग्रजी |
| **Group C :** | (खालीप पैकी कोणताही चार विषय निवडता येईल.) | |
| | Socialogy | मराठी |
| | History | हिंदी |
| | Geography | वैकल्पिक इंग्रजी |
| | Economics | अर्थशास्त्र |
| | Political Science | राज्यशास्त्र |
| | Defence Studies | संरक्षणशास्त्र |
| | Education | शिक्षणशास्त्र |

**टिप : प्रथम वर्ष कलासाठी पर्यावरण शास्त्र (Environmental Science) हा विषय अनिवार्य म्हणून विद्यापीठाने सन २००४ – ०५ पासून सुरू केलेला आहे.**

**पर्यावरणशास्त्र** : F.Y.B.A / T.Y.B.Sc वर्गासाठी पर्यावरणशास्त्र हा विषय सक्तीचा आहे. यासाठी स्वतंत्र्य १०० रू. फी आहे. विद्यापीठाच्या नियमानुसार याविषयात पास झालयाशिवाय पदवी मिळणार नाही.

**विद्यार्थ्यांसाठी** : ब्लॅक पॅंट व ब्लुव शर्ट

**विद्यार्थ्यीनींसाठी** : ब्लॅक सलवार किंवा पॅंट व ब्लुव टॉप, कुर्ता, शर्ट

**वैद्यकीय तपासणी** : प्रथम वर्ष कला व विज्ञानाच्या प्रत्येक विद्यार्थ्यास विद्यापीठ नियमानुसार वैद्यकीय तपासणी करणे आवश्यक आहे. त्याशिवाय परिक्षेचा निकाल जाहीर केला जाणार नाही.

द्वितीय वर्ष कला : (S.Y.B.A) CBCS Pattern

**SEMESTER - III**

1) **Compulsory English**

2) **Media Information Literacy (MIL)**

मराठी / हिंदी / इंग्रजी यापैकी कोणताही एक विषय.

3) **Discipline Specific Core Course (DSC)**

मराठी / हिंदी / इतिहास / भूगोल / अर्थशास्त्र / राज्यशास्त्र / संरक्षणशास्त्र / समजशास्त्र / शिक्षणशास्त्र यापैकी दोन विषय निवडावेत त्यापैकी एक विषय स्पेशल स्तरावरील (Special Leval) असावा.

4) **Skill Enhancement Course (SEC)**

मराठी / हिंदी / वैकल्पीक इंग्रजी/ इतिहास / भूगोल / अर्थशास्त्र / राज्यशास्त्र / संरक्षणशास्त्र / समाजशास्त्र / शिक्षणशास्त्र या विषयांपैकी जो विषय कौल्यासाठी (Skill) निवडावा.

5) **Discipline Specific Elective Course (DSE)**

मराठी / हिंदी / वैकल्पीक इंग्रजी/ इतिहास / भूगोल / अर्थशास्त्र / राज्यशास्त्र / संरक्षणशास्त्र / समाजशास्त्र / शिक्षणशास्त्र यातून एक विषय विशेष स्तरावर (Special Leval) निवडून त्याचेच दोन्ही विषय निवडावेत. म्हणजेच DSE1A (03) आणि DSE2A (03)

**६) अशा प्रकारे द्वितीय सत्रात एकूण सात (०७) विषय असतील**

**SEMESTER - IV**

**१) वरील निवडलेले सर्व विषय हे चौथ्या सत्रात राहतील.**

**२) DSC-3D (02) हा विषय विशेष स्तरावरील (Special Leval) विद्यार्थ्यांना त्या विषयाच्या प्रोजेक्ट करीता राहिल.**

**३) तिसऱ्या सत्रातील सात विषय व चौथ्या सत्रात वाढलेला DSC-3D (02) हा एक विषय असे एकूण आठ (०८) विषय चौथ्या सत्रात राहतील.**



**तृतीय वर्ष कला (T.Y.B.A) : (SEM-V-VI)**

**१) इंग्रजी विषय अनिवार्य (Compulsary English) आहे.**

**२) द्वितीय वर्ष कला (S.Y.B.A) वर्गात घेतलेले विशेषस्तर व जनरल विषय तेच घ्यावे लागतील. निवडलेल्या विषयांचे त्यांच्या प्रमाणे सहा पेपर**

**टिप :**

जे विद्यार्थी सामान्यज्ञान (General Knowledge) हा विषय द्वितीय वर्ष कला मध्ये नापास झाले असतील त्यांनी तृतीय वर्ष कला (T.Y.B.A) मध्ये हा विषय पास होणे आवश्यक आहे. त्याशिवाय पदवी मिळणार नाही.

**एम.ए.इतिहास** : कवयित्री उबहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने एम.ए.इतिहास संलग्नीकरण दिले आहे. मा.न्यायालय महाराष्ट्र शासन व विद्यापीठ निर्णयानुसार प्रवेश प्रक्रिया पूर्ण केली जाईल. हा अभ्यासक्रम दोन वर्षाचा असून प्रत्येक वर्गासाठी विद्यापीठ अभ्यासक्रमानुसार ४ पेपर शिकवीले जातील. क.ब.चौ.उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने एम.ए.साठी सन २०१६-१७ पासून सत्र परीक्षा (Semester Pattern) लागु केली आहे. ६०+४० पॅटर्न स्विकारला आहे. ६० गुणांची विद्यापीठामार्फत लेखी परीक्षा होईल. व ४० गुण अंतर्गत मूल्यामापनासाठी आहे. सत्रपूर्व परीक्षेस बसणे सक्तीचे राहील. त्याशिवाय सत्र मंजूर होणार नाही. सत्र मंजूरी शिवाय परीक्षा फॉर्म भरता येणार नाही. अंतर्गत परीक्षला अनुपस्थित राहणाऱ्या विद्यार्थ्यांचे विद्यापीठ परीक्षेचे गुण ग्राह्य धरले जाणार नाहीत.

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,नाशिक :**

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून बी.ए.बी.कॉम व एम.ए. (मराठी / हिंदी / इंग्रजी) या विषयांच्या अभ्यासक्रमांना प्रवेश मिळेल.शै.वर्ष २०२१-२२ पासून एम.बी.ए कोर्ससाठी मान्यता मिळाली आहे.

फी भरणे संबधी सुचना :

१) प्रवेश घेतल्यानंतर विद्यार्थ्यांला नियमानुसार फी भरवी लागेल प्रवेश अर्ज पात्रता फार्म व परीक्षा फार्म स्वतः भरावा. फार्म मध्ये दिलेल्या माहितीस विद्यार्थी स्वतः जबाबदार राहिल.

२) महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर मध्येच विद्यार्थी महाविद्यालयात सोडून गेल्यास त्याच्याकडून संपूर्ण सत्राची फी वसूल केली जाईल.

३) फी मुदतीच्या आत न भरल्यास नियमानुसार दंड आकारण्यात येईल.

४) फी संबधीचा तक्ता पहावा.

५) प्रवेश रद्द करणे संबधीची माहिती

६) महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर १५ दिवसाच्या आत प्रवेश रद्द केला तर ५० टक्के फी परत मिळेल, त्यानंतर जर विद्यार्थ्यांने प्रवेश रद्द केला तर विद्यापीठाच्या परिपत्रकानुसार कोणतेही शुल्क परत मिळणार नाही.

**परीक्षा अर्ज भरावयाची कार्यपध्दती :**

१) प्रथम वर्ष कला, विज्ञान विद्या शाखेतील प्रथमसत्राचे परीक्षा अर्ज दर शैक्षणिक वर्षात विद्यापीठाच्या सूचनेनुसार विनाविलंब शुल्कासह महाविद्यालयात स्विकारले जातील.

२) द्वितीय व तृतीय वर्ष कला, विज्ञान वर्गासाठी परीक्षा अर्ज भरण्यात वरील नियम लागु राहतील.

**विद्यापीठ परिक्षा गुण विभागणी व परिक्षेची कार्यपध्दती :**

१) प्रत्येक सत्र पध्दतीत विद्यार्थ्यासाठी लेखी परिक्षा सत्र ६० गुणांची राहील व अंतर्गत परिक्षा ४० गुणाची राहील. (सेमिनार/ट्युटोरीयल-१०, दोन टेस्ट-२० उपस्थिती-१०)

२) विद्यार्थ्यांस विषय उत्तीर्ण होण्यासाठी बहिस्थ परिक्षेत ६० पैकी किमान २४ गुण प्राप्त करणे आवश्यक आहे तसेच अंतर्गत मुल्यमापनासाठी ४० गुण पैकी किमान १६ गुण मिळवणे आवश्यक आहे.

३) विद्यार्थ्यास तृतीय वर्षात प्रवेश मिळविण्यासाठी प्रथम वर्षाचे सर्व विषय उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.



**विज्ञान शाखा अभ्यासक्रम (CBCS Pattern) नुसार विषयाची निवड करता येईल.**

| Sr. No. | F.Y.B.Sc | S.Y.B.Sc | T.Y.B.Sc |
|---|---|---|---|
| १ | कॉम्प्यूटर | कॉम्प्यूटर | कॉम्प्यूटर |
| २ | आय.टी | आय.टी | आय.टी |
| ३ | मॅथेमॅटीक्स | मॅथेमॅटीक्स | केमेस्ट्री |
| ४ | फिजिक्स | फिजिक्स | मायक्रोबॉयोलॉजी |
| ५ | इलेक्ट्रॉनिक्स | इलेक्ट्रॉनिक्स | |
| ६ | केमेस्ट्री | केमेस्ट्री | |
| ७ | झुलॉजी | झुलॉजी | |
| ८ | भूगोल | भूगोल | |
| ९ | मायक्रोबॉयोलॉजी | मायक्रोबॉयोलॉजी | |
| १० | बायोकेमेस्ट्री | बायोकेमेस्ट्री | |
| ११ | पर्यावरणशास्त्र (सक्तीचा) | मराठी किंवा इंग्रजी | |
| १२ | | जनरल नॉलेज सक्तीचा | |
| Note - | विद्यार्थी खालील पैंकी चार विषयांचा कोणताही ग्रुप घेऊ शकतात. | विद्यार्थी मराठी किंवा इंग्रजी आणि खालील पैकी तीन विषयांचा कोणताही एक ग्रुप घेऊ शकतो. | विद्यार्थी खालीलपैकी कोणताही एक अनिवार्य विषय घेऊ शकतात. |
| १ | कॉम्प्यूटर | कॉम्प्यूटर | कॉम्प्यूटर |
| २ | मॅथेमॅटीक्स | मॅथेमॅटीक्स | |
| ३ | फिजिक्स | फिजिक्स/इलेक्ट्रॉनिक्स | |
| ४ | इलेक्ट्रॉनिक्स | | |
| | | | |
| १ | आय.टी | आय.टी | आय.टी |
| २ | केमेस्ट्री | फिजिंक्स | |
| ३ | फिजिक्स | इलेक्ट्रॉनिक्स | |
| ४ | इलेक्ट्रॉनिक्स | | |
| | | | |
| १ | मायक्रोबॉयोलॉजी | मायक्रोबॉयोलॉजी | मायक्रोबॉयोलॉजी |
| २ | केमेस्ट्री | केमेस्ट्री | |
| ३ | झुलॉजी | झुलॉजी | |
| ४ | भूगोल | | |
| | | | |
| १ | केमेस्ट्री | केमेस्ट्री | केमेस्ट्री |
| २ | फिजीक्स | झुलॉजी | |
| ३ | झुलॉजी | भूगोल | |
| ४ | भूगोल | | |
| Note - | प्रत्येक विषयासाठी ३ थिअरी व प्रॅक्टीकल पेपर असतील | सर्व विषयांसाठी ३ थिअरी व एक प्रॅक्टीकल पेपर असतील. | सहा थेअरी व तीन प्रॅक्टीकल असतील. |

**टिप :** F.Y.B.A वर्गासाठी पर्यावरण (ENV Studies) आणि S.Y.B.Sc वर्गासाठी जनरल नॉलेज (GK) हे दोन विषय अभ्यासावयाचे आहे. या विषयात उत्तीर्ण झाल्याशिवाय पदवी मिळणार नाही.

## Fee Structure 2022-23

| | FYBA | SYBA | TYBA | FYBSC | SYBSC | TYBSC | MA-I | MA II |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Admission Fees | 50 | 25 | 25 | 50 | 25 | 25 | 50 | 25 |
| Registration Fees | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 100 | 75 |
| Library Fees | 150 | 125 | 125 | 150 | 125 | 125 | 300 | 250 |
| Medical Fees | 40 | 0 | 0 | 40 | 0 | 0 | 50 | 25 |
| Gymkhana Fees | 150 | 100 | 100 | 150 | 100 | 100 | 150 | 100 |
| Tutorial & Internal Exam | 100 | 60 | 60 | 100 | 60 | 60 | 100 | 150 |
| Emargency fee | | 10 | 10 | | 10 | 10 | | 10 |
| Disaster mgt Fees | 10 | 0 | 0 | 10 | 0 | 0 | 10 | 0 |
| Magazine Fees | 60 | 40 | 40 | 60 | 40 | 40 | 60 | 40 |
| College Dev Fund | 80 | 75 | 75 | 80 | 75 | 75 | 100 | 90 |
| Student Activities | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 75 | 40 |
| Poor Student Aid Fund | 60 | 40 | 40 | 60 | 40 | 40 | 100 | 40 |
| Library Deposite | 150 | 0 | 0 | 150 | 0 | 0 | 150 | 150 |
| Laboratory Deposite | 0 | 0 | 0 | 200 | 0 | 0 | 0 | 0 |
| Ashwamedh/Avishkar/S | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 |
| Computerisation Fees | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 |
| Student Group Insurance | 20 | 10 | 10 | 20 | 20 | 20 | 20 | 20 |
| E.suvidha Fees | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| Gathering Fees | 60 | 40 | 40 | 60 | 40 | 40 | 60 | 40 |
| Identity Card | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 50 | 30 |
| Alumni Association | 40 | 25 | 25 | 30 | 25 | 25 | 50 | 25 |
| Personality Development & Carrier Gaidence Fee | 50 | 75 | 75 | 50 | 75 | 75 | 50 | 75 |
| Mics Fees | 150 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 150 | 150 |
| Yuva Rang | 50 | 0 | 0 | 50 | 0 | 0 | 50 | 0 |
| Traning & Placement | 20 | 0 | 0 | 20 | 0 | 0 | 100 | 100 |
| Eligibility Fee | 100 | 0 | 0 | 100 | 0 | 0 | 100 | 50 |
| NSS self fin.Unit | 10 | 0 | 0 | 10 | 0 | 0 | 10 | 0 |
| Flag Fund | 10 | 0 | 0 | 10 | 0 | 0 | 10 | 0 |
| Green energy Fees | 100 | 0 | 0 | 100 | 0 | 0 | 200 | 0 |
| Laboratory Fee/Practical Fee | 0 | 0 | 0 | 3000 | 700 | 800 | 0 | 0 |
| Tuition Fees | 800 | 800 | 800 | 5000 | 2500 | 2500 | 5000 | 5000 |
| Environment Fee | 150 | 0 | 0 | 150 | 0 | 0 | 150 | 0 |
| ICT Fee | | 100 | 100 | | 100 | 100 | | 100 |
| General Knowledge Fee | 75 | 50 | 0 | 75 | 50 | 0 | 75 | 0 |
| Lab Development Fee | 0 | 0 | 0 | 0 | 2000 | 5000 | 0 | 0 |
| Total | 2655 | 1845 | 1795 | 9995 | 6255 | 9305 | 7420 | 6685 |

टिप : १) भूगोल विषय घेणाऱ्या विद्यार्थ्यांनै प्रयोगशाळा शुल्क २५०/- व शिक्षण शुल्क २०००/- भरणे आवश्यक आहे.

F.Y BSc. IT/Com. टयुशन फी ७००० + लॅब फी ८०००/-

S.Y BSc. IT/Com. टयुशन फी २५०० + लॅब फी ३०००/-

T.Y BSc. IT/Com. टयुशन फी ४००० + लॅब फी ४०००/-

F.Y BSc. Micro टयुशन फी ७००० + लॅब फी ८०००/-

S.Y BSc. Micro टयुशन फी ४५०० + लॅब फी ४५००/-

T.Y BSc. Micro टयुशन फी ७००० + लॅब फी ५०००/-



**विविध शिष्यवृत्ती संबधीची माहिती :**

१) भारत सरकार व महाराष्ट्र शासन यांनी मागास जाती व जमाती व इतर मागासवर्गातील विद्यार्थ्याच्या पालकांचे वार्षीक उत्पन्न निर्धारित केलेल्या मर्यादिपेक्षा कमी असेल ते विद्यार्थी शासनाच्या नियमाप्रमाणे शिष्यवृत्तीचे घेण्यास पात्र ठरतील अशा विद्यार्थ्यांना वरील शिष्यवुत्तीचे अर्ज कार्यालयातुन मिळतील.

२) शासनाच्या विविध वसतीगृहात निवास करणाऱ्या मागास जाती -जमातीच्या विद्यार्थ्यानी वेगळा फॉर्म भरावा.

३) प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती फॉर्म भरणे आवश्यक आहे. व ज्यांना शिष्यवृत्तीचा लाभ घ्यावयाचा नसेल त्यांनी लेखी हमीपत्र कार्यालयात जमा करणे आवश्यक आहे.

**शिष्यवृत्तीसाठी अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडावीत :**

१)शाळा सोडल्याचा दाखला एल.सी झेरॉक्स

३)१० वी, १२ वी गुणपत्रक झेरॉक्स

४)फोटो दोन प्रतित

५)प्रवेश पावती झेरॉक्स प्रत

६) आदेश क्रमांक

७) डोमेसाईलचा

८) वडिलांचा उत्पनाचा दाखलर (मुळ प्रत)

९) २० रू.स्टॅप (एन.टी,एनबीसी, ओबीसी)

१०)जात प्रमाणपत्र छाया वरील प्रत खाडाखोडे नसलेले)

११) वडील हयात नसल्यास मृत्यूचा दाखला

१२) वडील नोकरीत असल्यास तेथील पगाराचा दाखला / रोजगार करीत असल्यास मा. तहसिलदार यांचा दाखला (मुळप्रत)

१३) खंड असल्यास (गॅप सर्टीफिकेट)

**महाविद्यालयीन शिस्तीविषयक नियम :**

१) महाविद्यालय विद्यार्थ्यांकडून स्वंयस्फुर्त शिस्तीची अपेक्षा करने. व्यक्तीच्या व महाविद्यालयाच्या प्रतिष्ठेस बाधक, व जबाबदार वर्तन विद्यार्थ्यांनी कटाक्षाने टाळावी

प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या विषयाच्या तासांना वेळेवर उपस्थित रहावे.

२) आपली उपस्थिती ८०% पेक्षा कमी असल्यास तसेच पुर्व परीक्षेस गैरहजर राहणाऱ्या विद्यार्थ्यास विद्यापीठाच्या वार्षीक परीक्षेस बसुन दिले जाणार नाही.

३ महाविद्यालयाच्या आवारात असताना विद्यार्थ्याकडे गळयात ओळखपत्र असणे आवश्य आहे. ओळखपत्राशिवाय प्रवेश करता येणार नाही. ओळखपत्रावर आपला रक्तगट, फो चिटकवून त्यावर प्राचार्यांची सही घ्यावी.

४) विद्यार्थ्यांनी प्राध्यापकांशी, कार्यालयात, ग्रंथालय व प्रयोगशाळेत सौजन्यपुर्णतेने व न पणे वागावे.

५) तास चालु असतांना विद्यार्थ्यांने महाविद्यालयाच्या व अवारात फिरू नये.

६) प्राचार्यांच्या व संबधीत प्राध्यापकांच्या पुर्व परवानगीशिवाय विद्यार्थ्यानी इतर वर्गाच्या तासांना बसु नये.

७) महाविद्यालयाच्या आवारात वर्गात ग्रंथालयात मोबाईल बंद ठेवावेत.

८) रॅगींग व कोणतेही कृत्य केल्यास प्रवेश रद्द केला जाईल तसेच कायदेशीर कारवाई केल जाईल.

९) महाविद्यालयातच्या आवारात विद्यार्थ्यास धुम्रपान व गुटखा सेवन करण्यास बंदी आहे. धुम्रपान व गुटखा सेवन करतांना सापडल्यास शासकीय नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

**महाराष्ट्र छळवाद (रॅगींग) कायदा :**

कोणत्याही विद्यार्थ्याला गैरशिस्त वर्तनाचे प्रदर्शन करणे किंवा विद्यार्थ्यांना शारीरिक मानसिक इजा होईल किंवा विद्यार्थ्यांस धोका, लज्जा, भय निर्माण होईल. यामध्ये-

१) विद्यार्थ्याला दुखापत करणे, चिडवणे, मानहानी करणे, शिवीगाळ, दमदाटी, थट्टा मस्करी करणे

२) विद्यार्थ्याला तो राजी नसतांना त्याच्या मनाविरूध्द एखादी कृती करावयास लावणे.

**शिक्षा :** शैक्षणिक संस्था/संस्थेबाहेर प्रत्यक्ष, अप्रत्यक्षपणे छळवाद रॅगींग करणे, सहभाग घेणे प्रत्यक्ष प्रोत्साहन, चिथावणी देणे, प्रचार प्रसार करणे, अशा व्यक्तीस २ वर्ष कारावास व रू १०,०००/- रू. दंड होऊ शकतो. ज्या विद्यार्थ्याला शिक्षा झालेली आहे. त्यास महाविद्यालयातू काढून टाकले जाईल. सुज्ञ विद्यार्थ्यानी यापासून परावृत्त व्हावे.

श्रीमती बि.उ.पाटील.कला व कै.डॉ.भा.स.देसले विज्ञान महाविद्यालय,साक्री

**विद्यार्थ्यांसाठी नियमावली :**

१) महाविद्यालयात शिष्यवृत्ती घेणाऱ्या विद्यार्थ्यांची हजेरी ७५% असलीच पाहिजे.

२) विद्यार्थ्यास एकूण अभ्यासक्रम पुर्ण करेपर्यंत शिष्यवृत्ती लागु राहिल.

३) जर विद्यार्थ्याने बी.ए.नंतर बी.एड.अभ्सासक्रम पूर्ण केले असेल तर त्याने एम.ए.साठी प्रवेश घेतला तर त्यास शिष्यवृत्ती मंजूर होणार नाही.

४) विद्यार्थ्याने ज्या अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती घेतली तो अभ्यासक्रम त्याने पूर्ण केला पाहिजे जर त्याने अभ्यासक्रम अर्धवट सोडला व दुसऱ्या अभ्साक्रमासाठी तसेच विद्याशाखा बदल करणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर होणार नाही.

५) विद्यार्थ्याने जर पुर्नप्रवेश घेतला तर त्यास शिष्यवृत्ती मंजूर होणार नाही.

६) विद्यार्थ्याने शिष्यवृत्ती अर्ज ऑनलाईन मुदतीत भरावा. मुदतीत भरला नाही तर तो स्वतः त्यास जबाबदार राहिल.

७) विद्यार्थ्याने आपली शिष्यवृत्ती रक्कम मिळविण्यासाठी महाराष्ट्र बँक भाडणे शाखा व स्टेट बँक साक्री शाखा या राष्ट्रीय कृत बँकेतच आपले खाते उघडावे. आपल्या बचत खात्याचा क्रमांक (अकाउंट नंबर) विद्यार्थ्याने अचुक लिहावा. त्याने जर चुकीचा खाते क्रमांक दिल्यास त्याच्या खात्यावर शिष्यवृत्ती जमा न झाल्यास सर्वस्वी जबाबदारी त्या विद्यार्थ्याचीच राहिल.

८) प्रथम वर्षात प्रवेश घेतांना केंद्र सरकार, राज्य सरकार व विद्यापीठ यांच्या आदेशानुसार ज्यांचे वय १८ ते २१ आहे त्यांनी मेतदार नोंदणी करणे आवश्यक आहे.

**सुचना :**

१) भारत व महाराष्ट्र शासनातर्फे विविध शिष्यवृत्यांचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्याने चुकीची खोटी व कागदपत्रात खाडाखोड केल्यास माहिती पुरविल्यास त्यास तो विद्यार्थी जबाबदार असेल याबाबत कायदेशीर कार्यवाही केली जाईल.

२) वरील विषयांबाबतीच्या सूचना महाविद्यालयाच्या फलकावर लावल्या जातील. दिलेल्या वेळेतच विद्यार्थ्याने अर्ज करावा. वेळेत अर्ज न केल्यास अर्जाचा स्वीकर होणार नाही.

३) माहितीपत्रक नीट वाचावे. वर्षभर ते नीट जपून ठेवावे.

४) स्वतःच्या नावात, पत्यात बदल झाल्यास कार्यालयास कळवावे.

**महत्वाची माहिती :** महाविद्यालयामध्ये केंद्र शासनाचा अधिनियम २००५ च्या अनुषंगाने माहिती अपिलीय अधिकारी, माहिती अधिकारी व सहाय्यक माहिती अधिकारी म्हणून खाली कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | नाव | नेमणूक पद |
|---|---|---|
| १ | प्राचार्य डॉ.पी.एस.सोनवणे | अपिलीय अधिकारी |
| २ | श्री.सी.वाय.जाधव | सहाय्यक माहिती अधिकारी |
| ३ | श्री.डी.जे.पाटील | माहिती अधिकारी |

### एकलव्य विद्याधन कर्ज योजना :

एकलव्य विद्याधन कर्ज योजना ही पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आहे. योजनेत विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी येणाऱ्या खर्चाच्या ७० टक्के रक्कम कर्ज स्वरूपात आवश्यक त्या कागदपत्रांच्या पूर्ततेनंतर बँकेद्वारे उपलब्ध होते. शिक्षण कर्जासाठी व्याजाचा दर द.सा.द.शे. ११ टक्के असेल. शिक्षण कालावधीमधील खर्चाच्या व्याजाची रक्कम विद्यापीठ कार्यालयाद्वारे अदा केली जाते. ज्या विद्यार्थ्यांस प्रवेशित काळात शासकीय / निमशासकीय / सहकारी संस्था / बँका यांच्याकडून कोणतेही विद्यावेतन / शिष्यवृत्ती मिळत नसेल, असाच विद्यार्थी या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र राहील.

### डॉ.बाबासाहेब आंबेडकर वसतिगृह विद्यार्थी सहाय्यता योजना :

विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रशाळा अथवा विभागांमध्ये पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी नियमित प्रवेशित विद्यापीठाच्या वसतीगृहात निवासित विद्यार्थ्यांपैकी जे आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या होतकरू विद्यार्थ्यांना आर्थिकसहाय्य उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर वसतिगृह विद्यार्थी सहाय्यता कार्यान्वित करण्यात आली आहे.

### साहस कार्यशाळा :

विद्यार्थ्यांना साहसीवृत्ती होणे विषयी या कार्यशाळेत प्रशिक्षण व मार्गदर्शन दिले जाते. संकटाना धैर्याने सामोरे जाणे मार्ग काढणे, मदत करणे, गिर्यारोहण, रोपवे, पुल बांधणी, रस्ता दुरूस्ती, दिशा ओळख, आकाश, निरीक्षण, आत्मसंरक्षण व प्रतिकार आणि निसर्ग सहल असे विविध उपक्रम राबविण्यात येत असतात. प्रत्येक महाविद्यालयातील १ विद्यार्थी व १ विद्यार्थीनी या कार्यशाळेत सहभागी होवू शकतात.



### कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना/ आर्थिक दुर्बल घटक योजना

कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका ही पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आहे. तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, होतकरू व गरजू विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणासाठी ही योजना आहे. या योजनेचा उद्देश स्वावलंबनाने विद्यार्थ्याला श्रमाची आवड निर्माण करणे, श्रमाची प्रतिष्ठा वाढविणे, स्वयंरोजगारासाठी विद्यार्थ्यांना प्रवृत्त करणे आदि मुख्य उद्देश योजनेचे आहेत. योजनेत विद्यार्थ्यांने अध्ययनाच्या वेळेव्यतिरिक्त किमान तीन तास काम करणे अपेक्षीत आहे. या योजनेद्वारे विद्यार्थ्यांना आर्थिक लाभ मिळतो.

### विद्यार्थी संशोधन योजना

संशोधनाला प्रोत्साहन देण्यासाठी, संशोधक विद्यार्थी आर्थिक अडचणीमुळे मागे राहू नये. यासाठी संशोधन विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाद्वारे भरीव आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. विद्यापीठाचे विभाग व संलग्नीत महाविद्यालये यांचेसाठी संशोधन विकास योजना आहे. विद्यार्थी कल्याण विभाग अंतर्गत विद्यार्थी संशोधन प्रोत्साहन योजना, मा.कुलगुरू प्रायोजत विशेष संशोध योजना विज्ञान विषयात विशेष कार्य करणाऱ्या विद्यार्थ्यांस जी.एच.रायसोनी यांचे सौजन्याने तीन संशोधक विद्यार्थ्यांना रू. ७,०००/- ते रू. १०,०००/- पर्यंत प्रतिमाह संशोधन शिष्यवृत्ती दिली जाते.

### सांस्कृतिक गुण कार्यशाळा आयोजन

विद्यार्थ्यांना गायन, वादक, नृत्य, नाट्य, सुत्रसंचलन कार्यशाळा या क्षेत्रातील नव्या संकल्पना, तंत्रज्ञान अवगत व्हावे त्यांची सांस्कृतिक क्षेत्रातील प्रगती व्हावी यासाठी कार्यशाळांचे आयोजन विद्यापीठ स्तरावर विद्यार्थी कल्याण विभाग करते.

## उमवि संचलित चाणक्य स्पर्धा परीक्षा :

विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा कौशल्य वृध्दिगत करण्यासाठी व पूर्वतयारीसाठी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठ स्तरावर चाणक्य स्पर्धा परीक्षा एकाच दिवशी आयोजित करण्यात येते. प्रत्येक महाविद्यालय हे परीक्षा केंद्र आहे. ५० पेक्षा जास्त परीक्षार्थी असलेल्या महाविद्यालयांना पूर्वतयारीसाठी स्पर्धा परीक्षा पुस्तकांसाठी अनुदान देण्यात येते. उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रक देण्यात येतील. स्थानिक महाविद्यालयातील विद्यार्थी कल्याध अधिकारी हे या उपक्रमाचे प्रमुख असतील. तलाठी, पी.एस.आय, तहसिलदार या पदासाठीच्या स्पर्धा परीक्षेची तयारी या उपक्रमाद्वारे होईल. सदर परीक्षेत महाविद्यालयातील कितीही विद्यार्थी सहभागी होवू शकतात.

## उमवि विद्यार्थी दत्तक योजना :

विद्यापीठ विभागातील विविध प्रशाळा व शैक्षणिक विभाग यातील शिक्षण घेणाऱ्या गरजू व होतकरू विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थी कल्याण विभागाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून उमवि विद्यार्थी दत्तक योजना सुरू करण्यात आली आहे. त्यासाठी १० विद्यार्थी व १० विद्यार्थीनी यांना या योजनेचा लाभ देण्यात येतो.

## मा.कुलगुरू वैद्यकीय निधी योजना

विद्यार्थी सामुहिक सुरक्षा योजने शिवाय अपघाती / नैसर्गिक मृत्यू झाल्यास रू. ५,०००/- मृत विद्यार्थ्यांच्या पालकास मा.कुलगुरू वैद्यकीय निधीतून देण्यात येतील. प्रवेशीत विद्यार्थ्यांस एखादा गंभीर आजार, अपघाताने जखमी झाल्यास उपचारासाठी योजना त्या कागदपत्राची योग त्या कागदपत्राची खातरजमा करून सहाय्य करण्यात येते.

## युवती सभा कार्यशाळा

विद्यार्थी कल्याण विभागामार्फत नियमित शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीनींकरीता महाविद्यालयीन स्तरावर विशेष स्वरूपाच्या उपक्रमांचे आयोजन करणे करीता युवती सभा अंतर्गत स्वयंसिध्दा-अभियान व विद्यार्थी व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा आयोजीत करण्यात येते. प्रत्येक कार्यशाळेत महाविद्यालयातील ५० विद्यार्थीनी सहभागी होवू शकतात.

## करियर कट्टा

महाराष्ट्र शासन व विद्यापीठ यांच्या आदेशानुसार महाविद्यालय करियर क टा स्थापन करण्यात आला आहे. यात आ.पी.एस.आपल्या राखील रोजगार

प्राचार्य
त्रि.शि.स.चे श्रीमती वि.उ.पाटील कला व
कै.डॉ.भा.स.देसले विज्ञान महाविद्यालय
साक्री. ता साक्री. जि.धुळे

साक्री (धुळे)














कै.डॉ.बाबासो.भास्कर सदाशिव देसले
यांना जयंती निमित्त
५ ऑगष्ट
भावपूर्ण अभिवादन